



रयत शिक्षण संस्थेचे,

राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर.

मराठी विभाग सन २०२२-२३

## राजर्षी शाहू महाराज व्याख्यान अहवाल

दि.१९/ सप्टेंबर २०२२

# अहवाल

दि. १९ नोव्हेंबर २०२२ रोजी मराठी विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने "लोकराजा शाहू:राजा आणि माणूस"'या विषयावर मा.ॲड.संभाजीराव मोहिते यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी बोलताना ते म्हणाले, "शाहू महाराजांनी समाज मन बदलण्यासाठी अनेक क्रांतिकारी निर्णय घेतले. जे गरीब आहेत त्यांना स्वस्त दरात धान्य मिळावे म्हणून त्यांनी स्वस्त धान्य दुकानाचा पहिला क्रांतिकारी निर्णय घेतला. असे मत त्यांनी व्यक्त केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी महाविद्यायाच प्राचार्य डॉ.एल.डी.कदम हे होते. अध्यक्षीय मनोगतात ते म्हणाले की, "शाहू महाराजांनी आपल्या कृतीतून जातीयता नष्ट करून एक आदर्श डोळ्यासमोर ठेवला,पण आपण आज जातीचा झेंडा मिरवीत आहोत. असे विचार त्यांनी मांडले. यामध्ये कार्यक्रमाचे प्रास्ताविक इतिहास विभागाच्या प्रमुख डॉ.सुप्रिया खोले यांनी केल.यावेळी रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडी सदस्या मा.सरोज पाटील(माई)यांची प्रमुख उपस्थिती होती.मा.श्रीकांत घाडगे सरकार,मा.प्रकाश पाटील,सौ.गीता नलवडे,सौ,सीमाताई पाटील,कला व वाणिज्य विभागाच्या उपप्राचार्य प्रो.डॉ,सिंधू आवळे,महाविद्यालयातील शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी,विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन श्रीमती.एस.डी.मुरकर यांनी केले तर आभार डॉ.ममता कन्नाडे यांनी मानले.

**परिणाम/निष्पत्ती**

- विद्यार्थ्यांना शाहू महाराजांविषयी माहिती मिळाली .
- विद्यार्थ्यांना शाहू महाराजांच्या लेखन साहित्याविषयी ज्ञान प्राप्त झाले
- विद्यार्थ्यांना सामजिक जाणीव निर्माण झाली.

**लाभार्थी**

140







प्रा. डॉ. सिंधू जयवंत आवळे
मराठी, विभाग प्रमुख

RAJARSHI CHHATRAPATI SHAHU COLLEGE KOLHAPUR

प्राचार्य,
राजर्षी छ. शाहू कॉलेज
कोल्हापूर.